अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

आजचा रंग हिरवा

www.surajyadigital.com | शुक्रवार, दि.३० सप्टेंबर २०२२ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : ३ रा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## राज्यातील ५ लाख शेतकऱ्यांना दिलासा; मुख्यमंत्र्यांकडून मदतीची घोषणा



**मुंबई** : राज्यात अतिवृष्टीसाठी ठरवण्यात आलेल्या निकषांमध्ये बसत नसतानाही जून ते ऑगस्ट २०२२ या कालावधीत अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकारने मोठा दिलासा दिला आहे. विशेष बाब म्हणून सुमारे ७५५ कोटी रुपयांची मदत देण्याचा निर्णय मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत आज घेण्यात आला. याचा राज्यातील अंदाजे ५ लाखांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. नैसर्गिक आपत्तीमध्ये बाधित आपत्तीग्रस्तांना मदत देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक आज मंत्रालयात झाली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचेसह ग्रामविकासमंत्री गिरीश महाजन आदी वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

# डॉक्टर घाबरले आयटीच्या धाडीला, खोके घेऊन निघाले सासूरवाडीला

## खबर मिळताच पोलिसांनी अडवले गाडीला

सुराज्य/सोलापूर

**आगीतून उटले अन् फुफाट्यात पडले अशी एक मराठीत म्हण आहे. याच म्हणीचा प्रत्यय गुरुवारी सोलापुरातील एका नामांकित डॉक्टरला आला. काही दिवसांपूर्वी आयटीच्या धाडीतून वाचलेले ते डॉक्टर अन् त्यांनी जमवलेली माया घेऊन ते सासूरवाडीला निघाले. पण पोलिसांनी दाखवला रस्त्यातच त्यांच्या गाडीला रेड सिग्नल अन् सासूरवाडीला जाता-जाता पोलीस ठाण्यात जाऊन बसण्याची वेळ डॉक्टरवर आली.**

त्याचे झाले असे काही दिवसांपूर्वी शहरातील काही नामांकित डॉक्टरांवर आयकर विभागाने धाडी टाकल्या होत्या. त्यामुळे सोलापुरातील वैद्यकीय क्षेत्रात खळबळ उडाली होती.




जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात पोहचलेली हीच ती गाडी

त्यावेळी अन्य एका डॉक्टराने त्यांनी जमवलेली माया दुसरीकडे हलवली होती. आता वातावरण शांत होताच तीच खोकी पुन्हा हॉस्पिटलमध्ये परतली. हीच खोकी दोन गाड्यांमध्ये भरुन डॉक्टर सासूरवाडीला निघाले होते. त्यांच्या दोन्ही गाड्या रुपाभवानी मंदिराजवळ येताच पोलिसांनी अडवल्या. सासूरवाडीला निघालेल्या डॉक्टरांवर पोलीस ठाण्यात जाऊन बसण्याची वेळ आली.

### हॉस्पिटलमधून निघाल्या दोन, पोलीस ठाण्यात पोहचली एक गाडी

गुरुवारी सकाळी ७ च्या सुमारास रुपाभवानी मंदिराजवळील उड्डाणपुलाखाली जोडभावी ठाण्याचे पोलीस पथक थांबले होते. त्यांना तुळजापूरकडे जाणाऱ्या दोन गाड्या दिसल्या पोलिसांनी त्यांना अडवले. त्यापैकी एक गाडी आणि गाडीमधील डॉक्टरांना पोलीस ठाण्यात आणले. मात्र दुसरी गाडी कुठे गेली? हे डॉक्टरांनाही कळले नाही.

### पोलीस निरीक्षक फोन उचलेना, ठाणे अंमलदार माहिती देईना

डॉक्टरांच्या गाडीमध्ये रोकड सापडल्याचे जोडभावी पेठ पोलिसांनी मान्य केले. मात्र ती रक्कम किती?, काय कारवाई केली? यासंदर्भात रात्री उशिरापर्यंत माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला. जोडभावी पेठ पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक शिवाजी राऊत यांनी शेवटपर्यंत फोन घेतला नाही. पोलीस ठाण्यातील महिला ठाणे अंमलदार यांनी यासंदर्भातील माहिती देण्यास स्पषट नकार दिला. त्यामुळे शेवटपर्यंत वस्तूस्थिती समजली नाही.

### तर्क-वितर्क, उलट-सुलट चर्चा

डॉक्टरांच्या दोन्ही गाड्यांमध्ये काही खोके इतकी रक्कम होती, अशी चर्चा सुरु झाली. प्रत्यक्षात मात्र एकच गाडी पोलीस ठाण्यात पोहचली. दुसरी गाडी कुठे गेली? कोणी नेली? याबाबत अनेक तर्क-वितर्क लावले जात होते. त्यावरुन उलट-सुलट चर्चाही ऐकायला मिळत होती. रात्री उशिरापर्यंत यासंदर्भातील अधिकृत माहिती पोलिसांकडून न दिली गेल्यामुळे चर्चा वाढतच गेली.

▪ गाव कारभाऱ्यांना गाशा गुंडाळावा लागणार ▪ आयोगाच्या दणक्याने मोर्चेबांधणीवर गंडांतर

## ७ हजार ग्रा.पं.निवडणुकीचा धुराळा लांबणीवर

**सोलापूर**:राज्य निवडणूक आयोगाने राज्यातील ऑक्टोबर २०२२ ते डिसेंबर २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या सुमारे ७ हजार ६७५ ग्रामपंचायतींच्या निवडणुका लांबणीवर टाकल्या. त्यामुळे मुदत संपणाऱ्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्यात येणार आहे.

याबाबतचा आदेश आयोगाकडून गुरूवारी जारी करण्यात आला. जिल्ह्यातील १८९ ग्रामपंचायतींचा समावेश



आहे. आगामी निवडणुका डोळ्यापुढे ठेवून गाव कारभाऱ्यांची मोर्चेबांधणी सुरू होती परंतु आयोगाचा हा फर्मान येताच त्यावर पाणी फेरले गेले. आयोगाच्या या निर्णयाने विद्यमान कारभाऱ्यांना आपला गाशा गुंडाळावा लागणार आहे. निवडणुका कधी होतील,

### प्रशासकच कारभार गाजवणार; जिल्ह्यातील १८९ ग्रामपंचातींचा समावेश

याचा नेम नाही. तोपर्यंत प्रशासक ग्रामपंचायतींचा कारभार गाजवत राहतील.

राज्यातील ऑक्टोबर २०२२ ते डिसेंबर २०२२ मध्ये मुदत संपणाऱ्या सुमारे ७ हजार ६४९ तसेच नवनिर्मित ८ तसेच मागील निवडणुकांमधील समर्पित आयोगाच्या अहवालात दिसत नसलेल्या १८ अशा एकूण ७

> ग्रामपंचायतींच्या प्रभाग रचनेनंतर मतदार याद्या तयार करणे व प्रत्यक्ष निवडणूकीसाठी सुमारे २-३ महिन्यांचा कालावधी आवश्यक असल्यानं राज्य निवडणूक आयोगानं ग्रामविकास विभागाल पत्र लिहून प्रशासक नेमण्याविषयी कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

हजार ६७५ ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेणे क्रमप्राप्त आहे. सुमारे ७ हजार ६७५ ग्रामपंचायतींच्या निवडणुका घेणेकरीता आवश्यक ते नियोजन आयोगाच्या स्तरावर करण्यात येत आहे. त्यामुळे जस जशा संपतील, तस तसे त्या ग्रामपंचायतींवर प्रशासक नेमण्याची कार्यवाही करण्यात यावी, असे आदेश राज्य निवडणूक आयोगाने राज्याच्या ग्रामविकास खात्याला दिले.

## सिलेंडरच्या किंमती कमी करण्यासाठी आवाज उठवणार

### खासदार सुप्रियाताई सुळे यांनी साधला महिलांशी संवाद

सुराज्य/सोलापूर

देशभरामध्ये आज महागाईचा भस्मासुर वाढला आहे.महागाईने महिलांचे किचेन बजेटसुद्धा पूर्णपणे कोलमडून पडले आहे. सिलेंडरच्या किंमती १ हजार पार गेल्या आहेत.सबसिडीचा कोंडमारा झाला आहे. महिलांसाठी ही सर्वात मोठी महागाईची झळ आहे. त्यामुळे सिलेंडरच्या किंमती कमी करण्यासाठी आपण संसदेत आवाज उठवू, असे आश्वासन संसदरत्न खासदार सुप्रियाताई सुळे यांनी दिले.

सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस सेवादल आणि अर्बन सेलच्यावतीने शहराध्यक्ष चंद्रकांत पवार यांनी गुरुवारी सायंकाळी दमानी नगर येथील गडदर्शन समाज मंदिरात नवरात्रोत्सवानिमित्त बचत गट आणि विविध क्षेत्रातील महिलांसाठी संवाद कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी खासदार सुप्रियाताई यांनी महिलांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

यावेळी महिलांना स्वतःच्या पायावर उभे राहण्याबरोबरच आत्मनिर्भर बनण्याचा सल्ला खासदार सुप्रियाताई सुळे यांनी दिला. महागाई, दरवाढ, बेकारी, उद्योग व्यवसायाला प्राधान्य, बचत गटाची समस्या, शिक्षण, वैद्यकिय आदी क्षेत्रातील महिलांनी विचारलेल्या प्रश्नाला प्राधान्य देतानाच याबाबत आपण गांभीर्याने विचार करू असे खासदार सुप्रियाताई सुळे म्हणाल्या. राष्ट्रवादी काँग्रेस सेवादलाचे अध्यक्ष चंद्रकांत पवार आणि त्यांच्या पत्नी गीताताई पवार यांनी पवार यांनी खासदार सुप्रियाताई सुळे यांचे स्वागत केले.कार्यक्रम घेण्यामागचा उद्देश चंद्रकांत पवार यांनी सांगितला.



महिलांशी संवाद साधल्यानंतर खासदार सुप्रियाताई सुळे यांनी गडदर्शन कॉलनीतील सत्यनारायण बिडला, श्रीमती शोभा बिडला ,कविता बिडला आणि शैलेश बिडला कुटुंबाने सुरू केलेल्या फूड प्रॉडक्ट कारखान्याला भेट दिली. या ठिकाणी महिलांच्या हाताला काम मिळत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. त्यानंतर चंद्रकांत पवार कुटुंबीयांच्यावतीने खासदार सुप्रियाताई यांचा कौटुंबिक सत्कार करण्यात आला. गडदर्शन सोसायटीचे चेअरमन शिवदास चटके यांनी आभार मानले. या कार्यक्रमास नलिनी चंदेले, विद्या शिंदे, सायरा शेख, लता ढेरे, सिया मुलाणी, अनिता गवळी, प्रिया पवार, दीपक राजगे ,सिकंदर गोलंदाज, शिवदास चटके सर, अनिल गायकवाड, श्याम गांगर्डे, सुरेशसिंग पवार, युवराज सलगर, अमर गरड, अजय जगताप ,प्रभाकर मोरे,सूर्यकांत पवार, शंकर काळे यांच्यासह विविध क्षेत्रातील महिला उपस्थित होत्या.

## स्मृती मंदिर प्रशासनाच्या ढिसाळपणामुळे नाट्यव्यवस्थापकाचा आत्मदहनाचा इशारा

### ▪ उपरोधात्मक पोस्ट शेअर करून घेतला खरपूस समाचार

**सोलापूर** : महापालिका प्रशासनाच्या ताब्यात असलेल्या हुतात्मा स्मृती मंदिरातील एका नाट्य व्यवस्थापकाने थेट सोशल मीडियावर मी आत्मदहन करावे का अशी उपरोधात्मक पोस्ट शेअर करून प्रशासनाचा ढिसाळपणाचा खरपूस समाचार घेतला आहे.

हुतात्मा स्मृती मंदिर सोलापूर या नाट्यगृहाच्या तारखा बुकिंग ऑनलाइन पद्धतीने आहे. ऑनलाइन पद्धतीने करणारे आयुक्त यांची बदली झाली.त्यांनी हे करताना नाट्य व्यवस्थापकांना एक शब्द दिला होता. बुकिंगच्या वेळी प्रत्येक तारखेच्या वेळेला वेगळेवेगळे डिपॉझिट भरावे लागेल. ते डिपॉझिट ४८ तासांमध्ये आम्ही परत करू असे शब्द दिले होते.परंतु,तो शब्द आजतागायत त्यांच्यानंतरचे अधिकारी पाळत नाहीत. दोन- दोन ,तीन- तीन महिने डिपॉझिटची रक्कम रुपये दहा हजार ही मिळत नाही.गेल्या दोन महिन्यात ऑनलाईन सेवा देणारे विभाग यांच्या दुर्लक्षतेमुळे अनेकांना अनेक संकटाला तोंड द्यावे लागत आहे. ह्या ऑनलाईन सेवेबाबत या आठवडाभरात त्यांच्या प्रतिसादामुळे मनात एक विचार येऊन गेला आपण त्यांच्या कार्यालयात आत्मदहन करावे का? मी माझ्या पॅरेलेस आजाराला देखील खंबीरपणे टक्कर दिली. मात्र महानगरपालिकेच्या असहकार्यामुळे गेली अनेक महिने मी माझ्यासोबतचे नाट्य व्यवस्थापक हैराण आहोत. सांगा.. सोलापूरच्या नाट्य रसिक हो.! कशी तुम्हाला उत्तम उत्तम नाटके दाखवावी या सर्व प्रकारामुळे माझ्या मनातील नाराजी वाढत आहे. या हुतात्मा स्मृती मंदिराचे काय वैभव होते.!हे मी हुतात्मा स्मृती मंदिर पायाभरणीपासून पाहिला आहे त्यामुळे वाईट वाटते, असे नाट्य व्यवस्थापक गुरू वठारे यांनी पोस्टमध्ये म्हटले आहे.





## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




तयारी चालु आहे!!!

| कल्याण |
|---|
| 148-30-127 |
| मेन बाजार |
| 457-61-470 |

## जिथे राजधानीत राजकीय मिरवणुका निघाल्या, तिथेच निघाली 'हवाई कन्ये' ची शानदार मिरवणूक

- हवाई कन्या 'ऋतुजा' ची जंगी मिरवणूक
- कौतुकासाठी पाटील प्रेमी मिरवणुकीत
- उघड्या जीममधून उत्साही मिरवणूक
- गावच्या कर्तबगार लेकीवर पुष्पवृष्टी

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

अनगर ही मोहोळ तालुक्याची राजकीय राजधानी. या राजधानीत गेल्या ५० - ७५ वर्षात वेगवेगळ्या निमित्ताने राजकीय मिरवणुका निघाल्या. पण याच राजधानीत आज गुरूवारी वेगळे घडले. येथे अगदीच वेगळ्या क्षेत्रात करिअर करणाऱ्या पाटील परिवाराच्या लाडक्या लेकीची भव्य आणि तितकीच शानदार मिरवणूक निघाली. या भागाचे विकास रत्न माजी आमदार राजन पाटील यांची पायलट लेक ऋतुजा पाटील यांचीच निघालेली ती मिरवणूक.

लहानपणापासून पायलट होण्याचे स्वप्न पाहण्याबरोबर ते सत्यात उतरण्यासाठी अनोखे धाडस दाखविलेल्या ऋतुजा यांचे कॅनडामधील पायलट चालविण्याचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्या अनगर नगरीत दाखल झाल्या. त्याचे औचित्य साधून गुरूवारी ऋतुजा यांची राजधानी अनगर गावातून उघड्या जीपमधून उत्साही मिरवणूक



काढण्यात आली. या जल्लोषी मिरवणुकीवर उपस्थितांनी पुष्पवृष्टी केली. सर्वांच्या लाडक्या पायलट लेकीचे कौतुक पाहण्यासाठी अनगर आणि परिसरातील महिला, अबाल वृद्धांसह सर्वांनी उपस्थिती दाखवली. शिवाजी महाराज चौक ते मातोश्री निवासस्थान ( पाटील वाडा) या मार्गावरून मिरवणूक काढण्यात आली.

जंगी व शानदार मिरवणूक पाहण्यासाठी रस्त्यांच्या दुर्तफा गर्दी होती. ग्रामदैवत श्री अनगरसिध्द महाराज, श्री शंभूमहादेव तसेच लोकनेते बाबुरावअण्णा पाटील यांना अभिवादन करून मिरवणुकीला शुभारंभ झाला. मिरवणूक मार्गावर लाकड्या ऋतुजाचे औक्षण करून महिला आणि युवतींनी त्यांच्यावर पुष्पवृष्टी केली. ऋतुजा यांचे बंधू युवा नेते अजिंक्यराणा यांनी विजयी मिरवणुकीतील गाडी सारथ्य केले. माजी आमदार राजन पाटील, लोकनेते कारखान्याचे अध्यक्ष बाळराजे पाटील, युवा नेते अजिंक्य राणा यांच्यासह पाटील परिवार तसेच त्यांचे समर्थक, हितचिंतक, कार्यकर्ते मोठ्या संख्येने या मिरवणुकीत सहभागी झाले होते.

### लाडक्या ऋतुजा यांचे सध्याचे स्टेटस्...

राजन पाटील परिवारातील अत्यंत साहसी व धाडसी ऋतुजा यांनी बॅचलर इन ऐव्हीऐशन मॅनेजमेंटचे शिक्षण इंग्लंडच्या कॉन्व्हेंटरी विद्यापीठातून पूर्ण केले आहे तर पुढे पॅसिफिक प्रोफेशनल फ्लाईट सेंटर व्हॅनक्युअर कॅनडा येथे कमर्शियल पायलटचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे. सध्या ऋतुजा या कॅनडामध्ये एअर नॉर्थ या हवाई वाहतूक कंपनीच्या एक उत्कृष्ट कमर्शियल पायलट म्हणून कार्यरत आहेत.